# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००३२७३

**अपिलार्थी श्री. सुनिल मेघराज कांकरीया**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक**
निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई
नवीन प्रशासकीय इमारत, ६ वा मजला, शासकीय वसाहत,
बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. निबंधक भागीदारी संस्था**
निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई
नवीन प्रशासकीय इमारत, ६ वा मजला, शासकीय वसाहत,
बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०४.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०७.०४.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०६.०५.२०२३ | ०५.०६.२०२३ | २८.०६.२०२३ | २५.०७.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २३.१०.२०२३ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०५.०६.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २५.०७.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. ०६.०५.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार दि. २६.१२.२०२२ रोजीच्या पत्रासंबंधीत ५ मुद्यांची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.०६.२०२३ रोजी अपिलार्थीना मुद्देनिहाय उत्तर दिले. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २८.०६.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०७.२०२३ रोजी जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी संयुक्त स्वाक्षरीने त्यांचे लेखी निवेदन दि. २१.०४.२०२५ आयोगासमोर सादर करुन जन माहिती अधिकारी यांनी असे नमुद

..२/-

केले की, अपिलार्थींना माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ०५.०६.२०२३ रोजी मुद्देनिहाय उत्तर दिलेले आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०७.२०२३ रोजी जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
22-4-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २२.०४.२०२५**

State Information Commission ★ Greater Mumbai ★ सत्यमेव जयते